# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

## नोटीस

नागपूर महानगरपालिकेची विशेष सभा शुक्रवार दिनांक २०/०९/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता श्रीमंत राजे रघुजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता भरणार आहे.

नागपूर
दिनांक :- १६ /०९/२०१९

आदेशान्वये,

हस्ता/-
(हरीश नवलकिशोर दुबे)
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

मागील विचाराधिन विषय
(दि. २३/०७/२०१९)

वि.क्र. ३३८:– {समाजकल्याण विभाग}

नागपूर महानगरपालीका समाज कल्याण विभाग अंतर्गत महिला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातून मनपाची सोनेगाव येथील बंद असलेली सहकार नगर मराठी प्राथमिक शाळेत विरंगुळा केंद्र/वृद्धाश्रम केंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.तसेच सदर शाळेत माध्यमिक शाळा चालविण्याकरिता अध्यक्ष,दिनदयाल शिक्षण संस्था,दिनदयाल नगर संस्थेने मागणी केलेली आहे.

मा.उच्च न्यायालयातील PIL-१२२/२०१७ मधील दि.०४.१२.२०१८ च्या आदेशान्वये बंद शाळेचे विनियोग करतांना Third Party Interestमनपाने मा.उच्च न्यायालयाच्या परवानगीविना करू नये असे न्यायालयाचे आदेश आहे.करिता Third Partyम्हणून सदर शाळेची इमारत दिनदयाल शिक्षण संस्थेला देणे योग्य राहणार नाही.

उपरोक्त बाब लक्षात घेता,दोन्ही वापरापैकी सहकार नगर मराठी प्राथमिक शाळेचा विनियोग विरंगुळा केंद्र/वृद्धाश्रम केंद्र सुरु करण्यासाठी समाज कल्याण विभागास देण्याकरीता निर्णय घेण्याचा प्रश्न विचारात घेण्याबाबत .

टिप -:सविस्तर माहिती नस्तीत संलग्न

नवीन विषय

वि.क्र. ३७४: – {सचिवालय विभाग}

महानगरपालिकेतील मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना वरिल खर्च योग्य प्रकारे होते किंवा नाही याकडे लक्ष वेधन्यासाठी नगरसेवकापैकी जे नगरसेवक मागासवर्गीयांतील असतील अश्या 11 सदस्यीय त्यात भारतीय जनता पक्षाचे 8 सदस्य व बहुजन समाज पक्षातील 1 सदस्याची नेमणुक म.न.पा. विशेष सभा ठराव क्र. 410 दिनांक 23.07.2019 अन्वये करण्यांत आली आहे. उर्वरित भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे 2 सदस्य व बहूजन समाज पक्षाच्या एक सदस्यांनी राजीनामा दिला असल्याने त्यांचे पक्षाकडून 1 सदस्यांचे नामनिर्देशन दुर्बल घटक समिती (बजेट टू बजेट) सन 2019–2020 करिता करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :– सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. ३७५:— अग्निशमन सेवा शुल्क व्यतिरिक्त इतर कार्यासाठी
{अग्निशमन विभाग} आकारण्यात येणारे शुल्क वाढ करणे बाबत.

मंजूर महासभा ठराव क्र. 355 दि. 10.02.2009, महासभा ठराव क्रमांक 247 दि. 25.08. 2011, स्थायी समिती ठराव क्र. 182 दि. 24.10.2008 स्थायी समिती ठराव क्रमांक 136 दि. 05.10. 2012 व ठराव क्रमांक 364 दि. 09.12.2014 प्रमाणे अग्निशमन सेवा शुल्क व्यतिरिक्त इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

सन 2018—19 या आर्थिक वर्षात विभागाचे एकुण उत्पन्न रू. 2,69,96,382 याप्रमाणे झालेले असून फार कमी आहे. अग्निशमनाचे कार्य पार पाडण्यास संबंधित गरजा पुर्ण करण्यास विभागाचे बळकटीकरण होणे गरजेचे आहे. याकरीता विभागाचे उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 386 (2) प्रमाणे *Except as may otherwise be provided by or under this Act, for every such license, or written permission a fee may be charged at such rate as shall from time to time be fixed by the Commissioner, with the sanction of the Corporation.* उपरोक्त अधिनियमाचे तरतुदीनुसार अग्निशमन शुल्क आकारणी व्यतिरिक्त इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे वाढीव शुल्काचा खालीलप्रमाणे तक्ता सादर करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | सेवा | सेवेचा तपशील | प्रचलित दर (आकडे रूपयात) | सुधारीत दर (आकडे रूपयात) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाहरकत दाखला | 1) इमारत अग्निशमन सेवा शुल्क (प्रथम नाहरकत प्रमाणपत्र घेतेवेळेस) | तक्ता ''अ'' प्रमाणे | महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 मधील अनुसुची 1 दराप्रमाणे |
| | | 2) इमारत नकाशा छाननी फी (स्क्रुटनी फी) (प्रथम नाहरकत प्रमाणपत्र घेतेवेळेस) | अग्निशमन सेवा शुल्क तक्ता ''अ''च्या दरावर 2% | वरिल अग्निशमन सेवा शुल्काचे 2% दरा प्रमाणे |
| | | 3) इमारत सुचनापत्रांचे नुतनीकरण प्रमाणपत्र शुल्क | रू. 2000 | रू. 3000 |
| | | 4) इमारत सुचनापत्रांचे परीपुर्णता प्रमाणपत्र शुल्क | रू. 2,000 | रू. 10,000 (150 चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या व्यावसायिक इमारती) रू. 5,000(150 चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या निवासी इमारती) |
| | | 5) इमारतीचे वार्षिक अग्निशमन सेवा शुल्क | अग्निशमन शुल्काच्या 1% | अग्निशमन शुल्काच्या 1% |
| | | 6) व्यापार/व्यवसायासाठी फायर फिटनेस प्रमाणपत्र शुल्क | रू. 2500 | रू. 3,000 |
| | | 7) तात्पुरते बांधकाम/समारंभ/ मंडप/प्रदर्शनी/सर्कस/ मेळावा | रू. 2500 | रू. 3,000 |
| 2 | पाणी उपसा | अ) विहीर उपसा (खाजगी पाणी उपसा) 6 तासांकरीता<br>ब) त्यानंतर प्रती तास | रू. 500<br>रू. 100 | रू. 500 प्रथम 3 तासांकरीता व<br>त्यानंतर रू. 200 प्रती तास |
| | | अ) म.न.पा.च्या मलवाहिनी, लिकेज नाले व इतर बाबींनी खाजगी विहिरींचे पाणी दुषित झाल्यास, तसेच सार्वजनिक विहिरी | निःशुल्क | निःशुल्क (आरोग्य विभागातील सक्षम अधिकाऱ्याचे स्पष्ट शेऱ्यासह विभागाकडे येणारे अर्ज) |
| 3 | अग्निसुरक्षा बंदोबस्त | स्टॅण्डबाय डयुटी<br>अ) अग्निशमन वाहन व कर्मचारी यांचेसह प्रथम 8 तासांकरीता<br>ब) त्यानंतर प्रतीतास | रू. 4000<br>रू. 500 | 8 तासांप्रमाणे रू. 6000 |
| 4 | रुग्ण/ मृतदेह वाहिनी | अ) रुग्णवाहिका | अ) शहराकरीता मोफत<br>ब) म.न.पा. | सेवाबंद<br>विभागाचे अस्थापनेवर रूग्णवाहिका वाहनचालक व स्ट्रेचर बॉय पद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | हद्दीबाहेर रू. 10 प्रती कि.मी. प्रमाणे<br>क) हाल्टिंग चार्जेस रू. 50 प्रती तास | नाही. |
| | | ब) शववाहिका | अ) शहराकरीता मोफत<br>ब) म.न.पा. हद्दीबाहेर रू. 10 प्रती कि.मी. प्रमाणे<br>क) हाल्टिंग चार्जेस रू. 50 प्रतीतास | सेवाबंद<br>विभागाचे अस्थापनेवर शववाहक वाहन चालक व शववाहक कुली पद नाही. |
| 5 | | (आकस्मिक प्रसंगी)<br>अ) 4500 ते 5000 लिटर क्षमतेचे प्रती फायर टेन्डर | रू 500 | रू. 1000 |
| | पाणी पुरवठा | ब) 10,000 लिटर क्षमतेचे प्रती फायर टेन्डर | रू. 1200 | रू. 2000 |
| | | क) 10,000 लिटर क्षमतेचे प्रती वाटर टॅकंर बिना पंप | रू. 800 | रू. 1500 |
| | | ड) 10,000 क्षमतेचे वेगळे पंम्प लावून प्रती टॅकर पाणीपुरवठा | रू. 1200 | रू. 2000 |
| 6 | | म.न.पा. हद्दीबाहेर अग्निशमन सेवा (Fire Fighting Charges)<br>अ) वाटर टेन्डर/ फायर टेन्डर ट्रिपलमायलेज प्रति किमी. | रू. 30 | |
| | | ब) फायर टेंडर/इमर्जन्सी टेंडर पाठविण्याचे शुल्क | रू. 2000<br>8 तासांकरीता | रू. 40 प्रती किमी. प्रमाणे |
| | | क) वाहनावरील पंम्पाचे पंम्पीग चार्जेस | रू. 500 प्रती तास | |
| | | ड) 20% तुटफुट चार्जेस | 20% | |
| | | इ) हाल्टींग चार्जेस प्रती तास | रू. 300 | |
| | | फ) स्टॅण्डबाय डयुटी प्रती दिवस | रू. 2500 | |
| | अग्निशमन व बचाव कार्य | हॅड्रोलीक प्लॉटफार्म /टर्न टेबल लॅडर<br>अ) स्टॅण्डबाय डयुटी | रू. 3000 प्रती 8 तासांकरीता | |
| | | ब) शिडीचा वापर केल्यास | रू. 1000 अतिरीक्त प्रती तास | रू. 4000 प्रती तास |
| | | क) म.न.पा. हद्दीबाहेर | रू. 30 प्रती कि.मी. | |
| | | ड) हाल्टींग चार्जेस | रू. 500 प्रती तास | |
| | | फोम टेंडर चार्जेस<br>अ)म.न.पा. हद्दीबाहेर | रू. 30 प्रती किमी. | |
| | | ब) वाहनावर माउंटेड पंम्पींग चार्जेस | रू. 500 प्रती तास | रू. 40 प्रती किमी. प्रमाणे<br>फोम लिक्विड खरेदी दराप्रमाणे |
| | | क) फोम लिक्विड | खरेदी किमतीच्या दुप्पट | |
| | | ड) हाल्टींग चार्जेस | रू. 500 प्रती तास | |
| 7 | | पोर्टेबल पंप चार्जेस<br>अ) खाजगी कामासाठी | रू. 500 प्रती तास | अनु क्र. 2 मध्ये नमुद असल्याने रद्द |
| | पांणी पंपिंग | ब) बाहेरगावी फायर टेंडर सोबत नेल्यास | रू. 500 प्रती तास | रू. 500 प्रती तास (कार्य करतेवेळेस) |
| | | क) सबमर्सीबल पंप डिझलवर चालणाऱ्या जनरेटर सहित | रू. 500 प्रती तास | अनु क्र. 2 मध्ये नमुद असल्याने रद्द |
| 8 | वॉटर | फायबर/रबर बोट कर्मचाऱ्यांसह | रू. 500 प्रती तास | रू. 1000 प्रती तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रेस्क्यु | | | |
| 9 | तातपुरता नाहरकत दाखला | अ) तातपुरते फटाका/मुर्ती दुकानास / इतर व्यवसायास नाहरकत दाखला शुल्क | रू. 1,000 | रू. 2,000 (150 चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेले ) रू. 1000 (150 चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रफाळ असलेल्या व्यावसायिक धारकांनी मागणी केल्यास) |
| 10 | फायर ऑडिट | अग्निसुरक्षा संबंधातील तपासणी अर्जदारांचे विनंती अर्जानुसार | —— | रू. 3,000 |
| 11 | प्रशिक्षण | अ) अग्निशमन प्रशिक्षण महाविद्यालय / शासकीय/ खाजगी संस्था यांच्यातर्फे आलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण शुल्क | —— | रू. 1,000 व्यक्ती, प्रती महिना (भोजनखर्च सोडून) |
| | | ब) प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण (व्यावसायिक/खाजगी संस्था यांचे कडून विभागाला अर्ज प्राप्त झाल्यास शुल्क आकारणी ) | —— | 1 दिवस फी रू. 100<br>2 दिवस फी रू. 200<br>7 दिवस फी रू. 300<br>30 दिवस फी रू. 1000<br>(प्रशिक्षणार्थी भोजनखर्च परस्पर नेमणूक केलेल्या मेस कंत्राटदार यांना भुगतान करतील) |
| | | अग्निशमन व बचाव कार्याचे जनजागृती प्रशिक्षण राबवितेवेळेस निःशुल्क | —— | निःशुल्क |

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 386 (2) चे तरतुदीनुसार सुधारित अग्निशमन शुल्क आकारणी व्यतिरिक्त इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे वाढीव शुल्काचे विषयास महासभेने विचारात घेवून मंजुर करून घेणे.

टीप :— सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध

वि.क्र. ३७६:— {अग्निशमन विभाग}

अधिकारी/कर्मचारी यांचे वेगवेगळे पाठयक्रमा दरम्यान होणारा खर्च अनुज्ञेय करण्याबाबत.

अग्निशमन विभागातील अधिकारी तथा कर्मचारी त्यांच्या कर्तव्यकाळात कामाची गुणवत्ता वाढविण्याकरीता नियमित प्रशिक्षण घेणे आवश्यक असते. याकरीता नागपूर महानगरपालिकेद्वारे त्यांना राज्य शासनाचे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण व राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय येथील सब ऑफिसर्स कोर्स, स्टेशन ऑफिसर्स कोर्स, डिव्हिजनल ऑफिसर्स कोर्स आणि राष्ट्रीय नागरीक सुरक्षा महाविद्यालय (एनसीडीसी) येथील वेगवेगळया पाठयक्रमाकरीता पाठविले जातात.

या पाठयक्रमा दरम्यान अधिकारी /कर्मचारी यांना येणारा खर्च म.न.पा.तर्फे वहन केला जातो. याबाबत तात्कालीन प्रशासक श्री. बी.एन. माखीजा, यांचे दि. 21.08.1985 चे मंजुरीचे धोरण आहे. त्याप्रमाणे विभागातील एकुण 139 अधिकारी/कर्मचारी यांनी पाठयक्रम पुर्ण केलेले आहे. सेवाप्रवेश व पदोन्नती नियमावलीतील शैक्षणिक पात्रतेत अशा प्रकारचे पाठयक्रम उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे. सदर धोरण प्रशासक स्तराचे असून फार पूर्वीचे आहे. त्यामुळे या विषयाचे महासभा मान्यता धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय नामपा—2015/1652/प्र.क्र.1662नवि—26 दि. 12 मे, 2017 प्रमाणे अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे सेवाप्रवेश नियम मंजुर आहेत. ज्यामध्ये सरळसेवा भरतीचे अग्निशामक विमोचक यांना महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा अकादमी येथील 6 महिने कालावधीचे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. त्याकरीता 12 मे, 2017 नंतर रूजू होणाऱ्या अग्निशामक विमोचक यांना प्राथमिक अग्निशमन पाठयक्रम तथा त्या पदाकरीता लागणारे इतर कोणत्याही पाठयक्रमाचा खर्च स्वतः वहन करावा लागेल. तथापी, सेवाप्रवेश नियम मंजुर

होण्याआधी सरळसेवा भरतीने नियुक्त झालेले अग्निशामक विमोचक यांना पाठयक्रमादरम्यान झालेला खर्च अनुज्ञेय राहील.

तसेच अग्निशमन विभागाचे अधिकारी तथा कर्मचारी यांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय येथील सब ऑफिसर्स कोर्स, स्टेशन ऑफिसर्स कोर्स, डिव्हिजनल ऑफिसर्स कोर्स आणि राष्ट्रीय नागरीक सुरक्षा महाविद्यालय (एनसीडीसी) येथील वेगवेगळया पाठयक्रमाकरीता पाठविल्यानंतर उत्तीर्ण झाल्यास पाठयक्रमा दरम्यान नियमानुसार येणारा संपुर्ण खर्च म.न.पा. वहन करेल, या धोरण निश्चितीच्या विषयास विचारात घेणे.

टिप :— सविस्तर माहिती नस्तीत संलग्न

वि.क्र. ३७७:— सरळसेवा भरतीचे अग्निशामक विमोचकांचे रिक्त
{अग्निशमन विभाग} असलेल्या पदांची, पदभरती करणेबाबत.

शासन निर्णय क्र. नामपा—2015/1652/प्र.क्र.1662 नवि—26 दि. 12 मे, 2017 प्रमाणे अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे सेवाप्रवेश नियम मंजुर आहेत.

सेवाप्रवेश नियमांतील अग्निशामक विमोचक या पदातील शैक्षणिक पात्रतेत अट क्र. 2 — राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशमन पाठयक्रम उत्तीर्ण असावा याप्रमाणे नमुद असल्याने महासभेने या अटीमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा राज्य अग्निशमन केंद्र महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण महामंडळ, मुंबई (M.S.B.T.E.) यांचेकडील अग्निशामक प्रशिक्षण उत्तीर्ण असावा. ज्या पुरूष/महिला उमेदवारांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडील 6 महिने (किंवा समकक्ष) कालावधीचा पाठयक्रम उत्तीर्ण केला नसेल त्यांना नियुक्तीनंतर एक वर्षाच्या कालावधीत स्वखर्चाने हा पाठयक्रम उत्तीर्ण करणे बंधनकारक राहील. याप्रमाणे सुधारणा करण्यासंबंधातील मंजुर महासभा ठराव क्र. 155 दि. 08.12.2017 शासनाचे मान्यतेकरीता कार्या. पत्र क्र. 191/एमसी/2018 दि. 08.01.2018 प्रमाणे सादर करण्यात आले होते. शासनातर्फे या विषयास अद्यापही मान्यताप्राप्त झाली नाही. याबाबत म.न.पा.द्वारे पाठपुरावा करण्यासंबंधात कार्या. पत्र क्र. 12/एम.सी/2018 दि. 31.08.2018 व 57/ए.एम.सी/2019 दि. 08.07.2019 प्रमाणे सादर करण्यात आले होते.

सदर विषयास शासनातर्फे अद्यापपर्यंत मान्यता अप्राप्त आहे. सध्या विभागाचे आस्थापनेवर अग्निशामक विमोचकांची 500 पदे मंजूर आहेत. त्यापैकी 70 पदे कार्यरत असून 430 पदे रिक्त आहेत. म्हणजेच 86% पदे रिक्त असल्याने शहरातील मोठया स्वरूपाच्या आगीवर समर्थपणे कार्य करण्यास अडचण येत आहे.

करीता शासनाकडून दि. 12.05.2017 ला मान्य करण्यात आलेल्या सेवाप्रवेश व पदोन्नती नियमावली नुसार अस्तित्वात असलेल्या 8 स्थानकांप्रमाणे अग्निशमन विभागाचे आस्थापनेवरील ''अग्निशामक विमोचकांची'' सरळसेवा भरतीचे रिक्त असलेली पदे तात्काळ जाहिरातीने भरण्याचे विषयास महासभेने विचारात घेणे.

टिप :— सविस्तर माहिती नस्तीत संलग्न

वि.क्र. ३७८:— भांडेवाडी, नागपूर येथील कचऱ्यापासून विजनिर्मिती
{पिंच प्रकल्प} प्रकल्पाकरीता देण्यांत आलेल्या जागेवरील जुना कचरा मे. एस्सेल इंफ्राप्रोजेक्टस् लि. यांना जबलपूर येथे नेण्याचे कार्योत्तर मंजुरीचे प्रस्तावाबाबत.

भांडेवाडी, नागपूर येथे 10 एकर जागेवर कचऱ्यापासून विजनिर्मिती करण्याचे प्रकल्पाचा करारनामा मे. एस्सेल इंफ्राप्रोजेक्टस् लि. व मे. हिताची झोसन इंडिया प्रा. लि. (JV), मुंबई यांचेसोबत दि. 04.05.2017 रोजी करण्यांत आलेला असून प्रकल्प उभारणीकरीता त्यांना 10 एकर जागा तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरीत करण्यांत आलेली आहे. हया जागेवर जुना कचरा साचलेला असून करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार उपरोक्त नमूद एजन्सीलाच जुना कचरा पुनर्स्थित (Relocate)

करावयाचा आहे. सदरहू कचरा एजन्सीचे जबलपूर येथील प्रकल्पाकरीता उपयुक्त असल्याने त्यांनी कचरा नेण्याची परवानगी मागितलेली होती. मा. आयुक्त, मनपा यांनी दि. 13.03.2019 रोजी मा. महासभेच्या निर्णयाचे अधीन राहून परवानगी प्रदान केली.

करिता भांडेवाडी, नागपूर येथील 10 एकर जागेवरील जुना कचरा मे. एस्सेल इंफ्राप्रोजेक्टस् लि. व मे. हिताची झोसन इंडिया प्रा. लि. (JV), मुंबई यांना करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधीन जबलपूर येथे नेण्यास कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप : 1. सविस्तर माहिती नस्तीमधे उपलब्ध आहे.

वि.क्र. ३७९:— {सचिवालय विभाग}

नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे दिनांक २२ ऑगस्ट २०१९ चे महाराष्ट्र अध्यादेश क्र, XIX OF २०१९ अन्वये, "महाराष्ट्र विधान सभेच्या सार्वत्रीक निवडणुक असल्यामुळे काही महानगरपालिकांच्या महापौर आणी उपमहापौरांच्या निवडणुक तात्पूरत्या पूढे ढकलण्याची तरतूद"

महापौर आणी उपमहापौरांचा कार्यकाळ उपरोक्त अध्यादेश क्र, XIX OF २०१९ अन्वये दिनांक २२ ऑगस्ट २०१९ पासून पूढील तिन महिण्याच्या कालावधीकरिता राहील धरण्याबाबत नमुद आहे . करिता विषय मनपा सभाग़हाच्या माहितीस्तव सादर प्रस्तुत

टिप :- नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे दिनांक २२ ऑगस्ट २०१९ चे महाराष्ट्र अध्यादेश क्र, XIX OF २०१९ ची प्रत नस्तीत उपलब्ध आहे

वि.क्र. ३८०:— {वाहतूक विभाग}

नागपूर शहरातील वाहतुकीच्या कोंडीबाबत जनहित याचिका क्र. ५/२०१६ मध्ये वाहतुकीची कोंडी संपुष्टात आणण्याकरीता मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे विस्तृत पार्किंग व्यवस्थापन आराखडा मे. यु.एम.टी.सी. कंपनी हैद्राबाद यांनी तयार केलेला आहे. या विस्तृत पार्किंग व्यवस्थापन आराखडयामध्ये प्रामुख्याने खालील बाबी समाविष्ट आहेत. शहरातील मुख्यभाग, मुख्य भागालगत असलेले मुख्य तसेच लहान रस्ते, या ठिकाणी सार्वजनीक पार्किंगची व्यवस्था करणे, नो पार्किंग व पार्किंगची जागा ठरविणे, रस्त्याच्या बाजुला पार्किंग स्थळ ठरविणे, रस्त्यावर व्यवस्थितरीत्या पार्किंगची व्यवस्था करणे इं. बाबींचा समावेश आहे. करीता पार्किंग पॉलीसीच्या अनुषंगाने नागपूर शहराकरीता मे. यु.एम.टी.सी. यांनी तयार केलेल्या विस्तृत पार्किंग व्यवस्थापनच्या अंतिम आराखडयास मंजुरी प्रदान करण्याचा ठराव क्र. 444 वि. क्र. 336 दि. 22.08.2019 अन्वये सभागृहातत प्रेझेन्टेशन दाखवून चर्चा करण्यात यावी. या मा. सत्तापक्षा नेते श्री. सदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय सभागृहात प्रेझेन्टेशन दाखवून चर्चा करण्याकरिता प्रश्न विचारात घेणे.

टिप :–

पार्कींग व्यवस्थापनेचा आराखडा संबंधातील संक्षिप्त माहिती पुढील प्रमाणे आहे.

१. स्थायी समिती ठराव क्र. ४४२ दिनांक ३०.०१.२०१८ अन्वये विस्तृत पार्कींग व्यवस्थापनेचा आराखडा तयार करण्यातस्तव मंजुरी प्राप्त आहे.

२. सदरील ठरावाचे अनुषंगाने मे. यु.एम.टी.सी. हैद्राबाद, यांना दि. २२.०२.२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला. त्यानुषंगाने त्यांनी नागपूर शहराकरीता विस्तृत पार्कींग व्यवस्थापनेचा आराखडा तयार करून त्याचे सादरीकरण दिलेले आहे.

३. शहरात विविध ठिकाणी वाहन ठेवण्यास्तव जागा निश्चित नसल्याने अस्ताव्यस्त असे वाहन उभे करण्यात येतात परिणामतः वाहतुकीस अडथळा निर्माण होवून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव मे. यु.एम.टी.सी. हैद्राबाद यांनी शहरातील पार्कींग व्यवस्थे बाबत सर्व्हेक्षण करून, नागपूर शहरातील पार्कींग व्यवस्थापनेचा आराखडा तयार केलेला आहे.

———————————